**संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली, चंद्रपूर यांचेकरीता नवीन वाहन <u>खरेदी करण्यास मान्यता देणेबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-०६१८/प्र.क्र.१७३(भाग-१)/फ-५.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०४ मे, २०१९.

<u>संदर्भ</u> : अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/ नबाप्र/प्र.क्र.६०(२१६१)/१८९/२०१८-१९, दिनांक ०९.०५.२०१८.

**<u>प्रस्तावना :</u>**

बांबू एक महत्वाचं वनउपज असून वनालगत असलेल्या ग्रामीण व आदिवासी जीवनात बांबूचे महत्वाचे स्थान आहे. ग्रामीण व आदिवासी लोकांची उपजिविका बांबू व बांबूवर आधारित लघुउद्योगावर अवलंबून आहे. महसूल व वन विभागाच्या दि.०४.१२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये महारष्ट्र राज्यात नवीन बांबू धोरण जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणाच्या अंमलबजावणीकरीता शास्त्रोक्त पध्दतीने बांबू लागवड व औद्योगिक वापर, प्रसिध्दी व प्रसार करण्याकरीता चिचपल्ली, जि.चंद्रपूर येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. सदर प्रशिक्षण संस्थेसाठी विविध प्रवर्गातील एकूण २३ पदे मंजूर करण्यात आलेली असून त्यामध्ये गट-अ संवर्गातील संचालक हे पद मंजूर करण्यात आले आहे. या संस्थेसाठी एकही वाहन उपलब्ध नाही. ही बाब विचारात घेता, राज्य योजनेंतर्गत फिरत्या पथकाचे सक्षमीकरण (२४०६ २१६१) या योजनेंतर्गत संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली, चंद्रपूर यांचेकरीता नवीन वाहन खरेदी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य स्तरीय वाहन आढावा समितीने मान्यता दिल्यानुसार संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली, चंद्रपूर यांचेकरीता रु.६.०० लक्ष किंमत मर्यादेत (वाहनाची किंमत+विक्रीकर+टेम्पररी रजिस्ट्रेशन चार्जेस+मूल्यवर्धित कर+सहाय्यभूत साहित्य इत्यादी अंतर्भूत) नवीन वाहन खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रु.६.०० लक्ष (रुपये सहा लक्ष फक्त) इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर नवीन वाहन खरेदी करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) नवीन वाहन विहित कार्यपध्दतीस अनुसरुन खरेदी करण्यात यावे.
२) वित्त विभागाच्या दिनांक २१.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये अधिकाऱ्यांसाठी रु.६.०० लाखाच्या मर्यादेतच खरेदी करावयाची असून यात करांचा समावेश आहे.
३) नवीन वाहन ज्या अधिकाऱ्यास मंजूर करण्यात आले आहे, त्या अधिकाऱ्याने सदर वाहनाचा वापर उक्त कार्यालयाच्या शासकीय कामकाजासाठीच करावा.
४) वाहन अनुज्ञेय असणाऱ्या एका अधिकाऱ्याच्या वापरात फक्त एकच वाहन असावे.
५) नवीन वाहन खरेदी केल्यानंतर त्यासंबंधी अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

६) प्रस्तुत खरेदी करताना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.२४.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या खरेदीबाबतच्या अटी व शर्तीनुसार खरेदी प्रक्रियेची कार्यपध्दती अवलंबवावी.

७) वाहन खरेदी GeM Portal वरुन विहित पध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावी.

३. सदर वाहन खरेदीवर होणारा खर्च "मागणी क्रमांक : सी-७ प्रधान शिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०१ वनीकरण, १०१ (११) वनसंधारण व विकास (११) (२९) ५२ फिरत्या पथकाचे सक्षमीकरण (राज्य) (२४०६ २१६१), ५१-मोटार वाहने" या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध असणाऱ्या निधीतून भागविण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.११७/२०१९/विनियम, दि.१२.०३.२०१९ व अनौ.संदर्भ क्र.५०६/२०१९/ व्यय-१०, दि.११.०४.२०१९ च्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५०४१२३७४०४४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJAY DEORAO DODAL

Digitally signed by SUJAY DEORAO DODAL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=a6a471816b9dbfd727f2e5ec4825f4678c8393d846acd1c16b8936c8b3a519c6, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SUJAY DEORAO DODAL
Date: 2019.05.04 12:41:24 +05'30'

**( सुजय दोडल )**

**सह सचिव (वने), महसूल व वन विभाग.**

**प्रत:**

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर.
५) मुख्य वनसंरक्षक (संसाधन उपयोग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६) संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली, चंद्रपूर.
७) महालेखापाल १/२ (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
८) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
९) कक्ष अधिकारी (कार्यासन-ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०) कक्ष अधिकारी (कार्यासन-फ-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११) कक्ष अधिकारी (कार्यासन-विनियम/व्यय-१०), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) कार्यासन फ-५ निवड नस्ती.